नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 22/10/2021 (शुक्रवार)
(दुपार)

---

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक
## एकुण 9,20,000/–रू. चा मुद्देमाल जप्त

दिनांक 20/10/2021 ला पोलिस स्टेशन केळवद येथील स्टाफ पो.स्टे. परीसरात पेट्रोलिंग करीत असतांना त्यांना मुख्यबिरव्दारे खबर मिळाली की, मध्य प्रदेशातुन येथुन खुर्सापार रोडने काही लोक एमएच– 30/बीडी– 3827 क्रमांकाची पांढऱ्या रंगाची पिकअप गाडीने अवैधरित्या गोवंश जातीच्या जनावरांची वाहतुक कत्तलीचे उद्देशाने नागपुरकडे करत आहे. अशा खबरेवरून पोलिस स्टेशन केळवद स्टाफने पांढुर्णा ते नागपुर हायवे क्रमांक 47 वरील छत्रापुर शिवार जवळ नाकाबंदी लावली. त्यादरम्यान 04:30 वा. चे सुमारास एक एमएच– 30/बीडी– 3827 क्रमांकाची पांढऱ्या रंगाची पिकअप वाहन येतांना दिसले. तेव्हा सदर पिकअप वाहनाचे चालकास पोलिसाने वाहन थांबविण्याचा इशारा केला असता चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन न थांबविता रोडने जाणाऱ्या लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल इतक्या बेदरकारपणे पळवु लागला. त्याच्या वाहनाचा पाठलाग करून सदर वाहन छत्रापुर खदान पेट्रोलपंपाजवळ थांबविण्यात आले. वाहनाची पाहणी केली असता त्यात दोन इसम बसलेले दिसले व वाहनाचे पाठी मागिल डाल्यात गोवंश जातीचे जनावर कोंबुन भरलेले दिसले. सदर एमएच– 30/बीडी– 3827 क्रमांकाच्या पिकअप गाडीचे चालकास त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव आरोपी क्र. 1) सागर बबनराव भुजाडे वय 21 वर्ष रा. बाजार चौक वार्ड क्र. 03 लोधिखेडा जि. छिंदवाडा 2) सय्यद मुस्ताक सय्यद रहुफ वय 36 वर्ष, रा. कुलिस्था नगर नं. 02 अमरावती पो. स्टे. नागपुरी गेट असे सांगितले. नमुद गाडी मध्ये एकुन 8 गोवंश गायी कि. 1,20,000/–रू. चे जनावर कुर व निदर्यतेने वाहतुक करतांना मिळुन आले. आरोपीतांच्या ताब्यातुन जनावरे व वाहनासह एकुण किमंती 9,20,000/– रूपयाचा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे.

आरोपीतांविरूद्ध पोलिस स्टेशन केळवद येथे अप क्र 206/2021 कलम कलम 11(1),(घ)(ड)(च) प्रा.नि.वाग.प्र.अधि.1960 सहकलम 5(अ),9 महाराष्ट्र प्राणी रक्षण अधिनियम सहकलम 179,184 मोवाका सहकलम 119 महा.पोलीस कायदा अन्वेय गुन्हा नोंद करण्यात आला आहे. दोन्ही आरोपीतांना अटक करण्यात आलेले आहे. पुढील तपास पोलिस हवालदार किशोर ठाकरे 8007492656 हे करित आहे.

सदरची कार्यवाही पोलिस अधीक्षक नागपुर ग्रामीण श्री. विजयकुमार मगर, अपर पोलिस अधीक्षक श्री राहुल माकणीकर, उपविभागिय पोलिस अधिकारी सावनेर श्री. अशोक सरंबळकर यांचे मार्गदर्शनात ठाणेदार पोनि श्री राहुल सोनवणे, पोलिस हवालदार किशोर ठाकरे, रविन्द्र डोरले, पोशी धोंडुतात्या देवकते, पंकज कोहाड, सचिन येळकर व चालक पोहवा गुणेश्वर डाखोळे यांनी केलेली आहे.





पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर